# दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यवतमाळ

# नोकरभरती जाहीरात

**(कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी (शिपाई) पदांच्या भरतीकरीता)**

दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यवतमाळ यांना खालील रिक्त पदे भरण्याकरीता ऑनलाईन पद्धतीने सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारकडुन विहीत नमुन्यात ऑनलाईन पद्धतीने www.ydccbank.com या संकेत स्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत. आपण बँकेचे नोकरभरतीचा संकेतस्थळ www.ydccbank.org या संकेतस्थळावर नोकरभरतीची लिंक उपलब्ध आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणा करण्याचा कालावधी | दि.18.09.2025 ते दि.30.09.2025 |
| 2 | परिक्षा शुल्क स्वीकारण्याचा अंतीम दिनांक | दि.30.09.2025 सायं. 5.00 वा. पर्यंत |
| 3 | परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| 4 | परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| 5 | मुलाखत दिनांक | ऑनलाईन परिक्षा निकालानंतर बँकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

**-:सुचना:-**

1. परिक्षा शुल्क संकेत स्थळावर अद्यावत [Update] केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पुर्ण होणार नाही.
2. उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व Online पेमेंट गेटवे द्वारा भरणा करावी लागेल.
3. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वत:चा ई-मेल आईडी, मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे.
4. उमेदवारांनी अर्ज भरतांना सदर पदासाठी आवश्यक पात्रताधारक असल्याची खात्री स्वत: करुनच अर्ज भरावा.

Y.D.C.C.Bank H.O. Yavatmal

5. सदर भरती प्रक्रिया दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

6. अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक तो निर्णय घेण्याचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.

**शैक्षणिक अर्हता:-**

| पदाचे नांव | पद संख्या | वयो मर्यादा | शैक्षणीक पात्रता | इतर पात्रता |
|---|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | 119 | 21 ते 35 वर्ष | कोणत्याही शाखेचा पदविधर किमान 45% गुणांनी उर्त्तीण असावा. | GDC&A तसेच CAIIB किंवा बँकिंग डिप्लोमा असल्यास प्राधान्य, संगणकाचे ज्ञान आवश्यक राहील. |
| सहाय्यक कर्मचारी (शिपाई) | 14 | 18 ते 35 वर्ष | दहावी पास | -- |

* दि.30.09.2025 रोजी वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

* **परिविक्षाधीन कालावधीनंतर प्राप्त होणारे एकुण अंदाजीत एकुण वेतन :-**

| पद | मुळ पगार |
|---|---|
| कनिष्ठ लिपीक | 15200 + DA + HRA |
| सहाय्यक कर्मचारी (शिपाई) | 12200 + DA + HRA |

**(परिस्थितीनुरुप वेतन निश्चितीचा अधिकार बँक राखुन ठेवत आहे.)**

**निवड कार्यपद्धती :-**

**1) <u>ऑनलाईन परिक्षा</u> :-**

कनिष्ठ लिपीक श्रेणीतील पदांकरीता 90 गुणाची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. यामध्ये बँकिंग, मराठी व्याकरण, इंग्रजी, सामान्य ज्ञान, गणित व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल तसेच परिक्षेचे माध्यम मराठी असेल.

सहाय्यक कर्मचाऱ्यांकरीता 90 गुणांची ऑनलाईन परिक्षा राहील. त्यामध्ये सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल.

**2) <u>कागदपत्रे पडताळणी</u> :-**

Y.D.C.C.Bank H.O. Yavatmal

उमेदवारास ऑनलाईन परिक्षेतील गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखती चे पुर्वी शैक्षणीक व इतर संबंधीत मुळ प्रमाणपत्राची प्राथमीक कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवाराने मुळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रे पडताळणी मध्ये पात्र होणाऱ्या उमेदवारास बँक धोरणाप्रमाणे बँक मुलाखतीस पात्र होईल.

**3) <u>मुलाखत</u> :-**

कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी (शिपाई) पदासाठी ऑनलाईन परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात ऑनलाईन परिक्षेचे गुणानुक्रमे मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखती करीता 10 गुण (शैक्षणीक पात्रतेकरीता 5 गुण व मौखिक मुलाखतीकरीता 5 गुण) राहतील. उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस पात्र राहणार नाही.

**4) <u>उमेदवाराची अंतिम निवड सुचि</u> :-**

उमेदवाराचे ऑनलाईन परिक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरिज करुन एकुण 100 गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सुचि तयार करण्यात येईल.

*** परिविक्षाधीन कालावधी [प्रोबेशन पिरियड] :-**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना एक वर्षासाठी परिविक्षाधीन कालावधी [प्रोबेशनरी] सेवेत नेमणुक दिली जाईल. नेमणुक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधी मध्ये कनिष्ठ लिपीकास रु.11,000/- प्रति महिना व सहाय्यक कर्मचाऱ्यास रु.7000/- प्रतिमहिना एकत्रित पगार देण्यात येईल.

*** ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पद्धत :-**

1) कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी (शिपाई) पदाकरीता अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदविलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर [DND] असल्यामुळे संपुर्ण प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच ई-

Y.D.C.C.Bank H.O. Yavatmal

मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणिना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

2) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणीक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांने त्याचे पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रृटी राहील्याने भरतीच्या कुठल्याही टप्यावर अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शैक्षणीक आर्हता, वयोमर्यादा वगैरेची पात्रता तपासुन ऑनलाईन अर्ज करावा.

3) उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी / छानणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छानणी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नमुद केलेल्या गृहित पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छानणी करण्यात येईल. सदर छानणी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात यईल.

पात्रताधारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार बँकेने राखुन ठेवले आहेत व याबाबत उमेदवारांना कोणतीही तक्रार करता येणार नाही.

4) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सुचना www.ydccbank.com व बँकेच्या www.ydccbank.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

5) कनिष्ठ लिपीक व सहाय्यक कर्मचारी (शिपाई) पदाकरीता रु.900/- + GST रु.162/- = रु.1062/- सर्व करांसह परिक्षा शुल्क आकारल्या जाईल. परिक्षा शुल्क हे ना-परतावा राहील. परिक्षा शुल्काची रक्कम दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व Online Payment Gateway द्वारा भरणा करावी लागेल. त्यासाठीचे परिक्षा शुल्क दि. 30.09.2025 रोजी दु.5.00 वा.पर्यंत स्वीकारले जाईल. सुट्टीचे दिवशी सुद्धा अर्ज स्विकारल्या जातील. परिक्षा शुल्क भरलेले उमेदवारच ऑनलाईन परिक्षेस पात्र राहतील.

**6) परिक्षा शुल्क खालील प्रमाणे स्वीकारले जाईल.**

Y.D.C.C.Bank H.O. Yavatmal

उमेदवाराने सर्व प्रथम संकेत स्थळावरील जाहिरात व सुचना वाचुन घ्याव्यात त्यानंतर [Apply New Registration] ऑनलाईन या बटनावर क्लीक [Click] करावे. ऑनलाईन अर्ज परिपुर्ण भरल्यानंतर परिक्षा शुल्क पुढील प्रमाणे भरावयाचे आहे.

उमेदवारांनी परिक्षा शुल्क (रक्कम) संकेत स्थळावर Online Payment Gateway द्वारा भरणा करावे लागेल. त्यानंतर अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण होईल. त्यानंतर उमेदवारांनी त्यांचा अर्ज संकेत स्थळावरुन स्वत:च्या माहितीसाठी डाऊनलोड करुन घेणे. ही सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

7) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वत:चे JPG / JPEG या प्रकारामध्ये स्कॅन केलेले अद्यावत छायांचित्र [फोटो] व पांढऱ्या कागदावर काळया शाहीच्या पेनाने स्वत: स्वाक्षरी करुन JPG / JPEG या प्रकारामध्ये स्कॅन केलेली स्वाक्षरी संकेत स्थळावरील सुचने नुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायांचित्र [फोटो] स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज, तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या ईमेजची साईज संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

8) ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम तारीख दि. 30.09.2025 रोजी रात्री 11.00 पर्यंत असुन त्यानंतर संकेतस्थळावरील अर्ज भरणा करण्याची लिंक बंद केली जाईल.

**<u>ऑनलाईन परिक्षेच्या सुचना :-</u>**

ऑनलाईन परिक्षेची माहिती उमेदवारास ई-मेल / एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक, इत्यादी बाबतची व विविध सुचना या केवळ संबंधीत संकेत स्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सबब सदर भरती प्रक्रिये दरम्यान संकेत स्थळावर याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन भरती प्रक्रियेची अद्यावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवारास ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरतांना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

**<u>सर्वसाधारण सुचना :-</u>**

1) उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

2) ऑनलाईन परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल.

3) काही अपरिहार्य / आपातकालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे, पुढे ढकलणे, अंशत: बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

4) भरती प्रक्रिये दरम्यान उद्धवणारे वाद / तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.



Y.D.C.C.Bank H.O. Yavatmal

5) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा / कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल.

6) भरती प्रक्रियेत/ निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात व संकेत स्थळावर प्रसिद्ध केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना पत्राने लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही.

7) उमेदवाराचे महाराष्ट्र राज्यात अधिवास असणे आवश्यक आहे. यवतमाळ जिल्ह्यात अधिवास असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

8) विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीनंतर सादर करणे बंधनकारक राहील.

9) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा प्रामुख्याने यवतमाळ किंवा नजीकच्या जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर घेण्यात येईल.

10) बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षे संदर्भातील मार्गदर्शनातील कोणत्याही पब्लीकेशन एजन्सीची / व्यक्तीची नियुक्ती केलेली नाही. या संदर्भात कोणतीही जाहिरात अगर माहिती ही बेकायदेशीर आहे असे समजण्यात यावे.

11) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

12) अर्जदाराना अर्ज भरतांना अडचणी / शंका असल्यास या संदर्भातील FAQ's Application Login Page वर उपलब्ध आहेत. या व्यतिरिक्त काही अडचणी आल्यास संकेत स्थळावरील कॉल सेंटरवर सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वा. पर्यंत संपर्क करावा.

13) राष्ट्रीयकृत / व्यापारी / खाजगी व सहकारी बँका आणि अन्य आर्थिक संस्थांमधुन बडतर्फ / निलंबीत केलेले उमेदवार भरती प्रक्रियेसाठी पात्र असणार नाहीत. उमेदवारांनी ही माहिती बँकेस न देता भरती प्रकीयेत सहभागी झाला आणि सदर बाब बँकेच्या निर्दशनास आल्यास भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा बँकेमध्ये नियुक्ती झालेवरही उमेदवारास अपात्र करण्यात येईल.

14) 45% पेक्षा कमी टक्केवारी व इतरही कुठलीही खोटी माहीती भरु नये. भरल्यास फौजेदारी गुन्हा दाखल केल्या जाईल.

सदर पदामध्ये वाढ किंवा घट झाल्यास रिक्त पदाच्या संख्येत बदल करण्याबाबतचे अधिकार पुर्णपणे बँकेस राहतील.

**ठिकाण:** यवतमाळ **प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**

**दिनांक:** 17.09.2025 दि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, यवतमाळ